विविध मानव निर्मित घटनांमध्ये बाधित होणाऱ्या व्यक्तींना मदत देण्याचे धोरण ठरविण्यासाठी मंत्रिमंडळ उपसमिती गठीत करणेबाबत ....

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय, क्रमांक: सीएलएस- २०१८/प्र.क्र.९८ /म-३
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक: ४ मे, २०१८

प्रस्तावना :

शेतीमध्ये किटकनाशक फवारणी करताना होणारी विषबाधा, सार्वजनिक ठिकाणी व धार्मिक ठिकाणी होणारी चेंगराचेंगरी व निवासी इमारत कोसळणे यासारख्या विविध मानव निर्मित घटनांमध्ये बाधित होणाऱ्या व्यक्तींना मदत करण्यासाठी नवीन योजना अंमलात आणण्यासाठी दिनांक १७.४.२०१८ रोजी विभागामार्फत मंत्रिमंडळास प्रस्ताव सादर करण्यात आला होता. विभागाने सादर केलेल्या प्रस्तावावर दिनांक १७.४.२०१८ च्या मंत्रिमंडळ बैठकीमध्ये चर्चा होवून खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे :

" याबाबत होणाऱ्या घटनामध्ये बाधित होणाऱ्या व्यक्तींना मदत देण्याबाबतचे धोरण ठरविण्यासाठी मंत्रिमंडळ उपसमिती गठीत करण्यात यावी व मंत्रिमंडळ उपसमितीच्या शिफारशीनुसार पुढील कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात यावी." त्यानुसार उपरोक्त प्रयोजनासाठी मंत्रिमंडळ उपसमिती गठीत करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :

मंत्रिमंडळाने दिनांक १७.४.२०१८ च्या मंत्रिमंडळ बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार उपरोक्त विषयावरील धोरण ठरविण्यासाठी खालीलप्रमाणे मंत्रिमंडळ उपसमिती गठीत करण्यात येत आहे.

१	मा.मंत्री, मदत व पुनर्वसन	अध्यक्ष
२	मा. मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण	सदस्य
३	मा.मंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य	सदस्य
४	मा.राज्यमंत्री, मदत व पुनर्वसन	सदस्य
५	अपर मुख्य सचिव/सचिव,मदत व पुनर्वसन	सदस्य-सचिव

२. विविध मानव निर्मित घटनांमध्ये बाधित होणाऱ्या व्यक्तींना मदत देण्यासाठी शासनाचे धोरण ठरविण्यासाठी मंत्रिमंडळ उपसमितीने आपला अहवाल शासनास १ महिन्याच्या कालावधीत सादर करावा.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०५०४१५३००८७९१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Subhash Hanmant Umaranikar

Digitally signed by Subhash Hanmant Umaranikar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d5ea2bb9565eeb9b02d583f130371941a03fc5d98df65d3daafe66960a165024, serialNumber=596a24adfcfcd3edb4245812c0eaccecdf4de3ec6a308b42a682a980bca4db38, cn=Subhash Hanmant Umaranikar
Date: 2018.05.04 15:33:25 +05'30'

(सुभाष उमराणीकर)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव,मंत्रालय,मुंबई
२) मा. मंत्री, मदत व पुनर्वसन यांचे खाजगी सचिव,
३) मा.मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण यांचे खाजगी सचिव,
४) मा.मंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य यांचे खाजगी सचिव,
५) मा.राज्यमंत्री, मदत व पुनर्वसन यांचे खाजगी सचिव,
६) मा.मुख्य सचिव,मंत्रालय,मुंबई
७) अपर मुख्य सचिव (मदत व पुनर्वसन),मंत्रालय,मुंबई,
८) वित्तिय सल्लागार व सहसचिव,मदत व पुनर्वसन
९) निवड नस्ती (कार्यासन म-३)